कार्यालय प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, गडचिरोली.
क्रंमाक स.अ.(बांध.)/२३०२/२०२६, दिनांक : १२ /०६/२०२६.

दरपत्रक/निवीदा सुचना

याद्वारे कळविण्यांत येते की, गडचिरोली मुख्यालयी जिल्हा न्यायाधीश-३ तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश, हे न्यायालय नव्याने निर्माण झाल्याने सदरहु न्यायालयाकरीता खालील वर्णन असलेले इन्व्हर्टर बॅट-या तसेच श्री एस.बी.विजयकर, सहदिवाणी न्यायाधीश (व.स्तर) तथा अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, गडचिरोली यांचे निवासस्थानाकरीता इनर्व्हटर स्थानिक बाजारातून खरेदी करावयाचे असल्याने त्याबाबत ईच्छुक प्रतिष्ठानांची तुलनात्मक दराची सिलबंद निवीदा मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, गडचिरोली यांच्या नावाने दि. १७/०६/२०२६ च्या सायंकाळी ५.४५ वाजेपर्यंत जिल्हा न्यायालय, गडचिरोली येथे सादर करण्यांत यावे. तसेच लिफाफ्यावर **" इन्व्हर्टर बॅट-या व इनर्व्हटर खरेदी बाबतची निविदा"** असे नमुद करावे.

अ.क्र.	मागणी केलेल्या वस्तुचे विवरण	मागणी संख्या
1	Inverter Battery 150AH/ 12V Tubular BATTERY(Exide /Okaya) **(नवनिर्मित जिल्हा न्यायालय-३ तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश, गडचिरोली करीता)**	02
2	Inverter Microtech company 1600/1725 VA Digital Inverter (सहदिवाणी न्यायाधीश(व.स्तर) तथा अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, गडचिरोली यांचे निवासस्थानाकरीता)	01

अटी व शर्ती :-

१. वरील विवरणामध्ये नमुद केलेले इन्व्हर्टर बॅट-या व इनव्हर्टर स्पेशिफीकेशनप्रमाणे संबंधीत न्यायालयात पुरवठा करणे व स्थापीत करुन देणे अनिवार्य राहील. व त्यांचे दर सर्व करासहीत असले पाहीजे. (Including or Excluding) याप्रमाणे निवीदामध्ये स्पष्टपणे नमूद करावे.

२. ओकाया बॅटरी व एक्साईड कंपनीच्या इनव्हर्टर बॅट-यांचे दर निविदेमध्ये वेगवेगळे नमूद करावे.

३. निवीदामध्ये इन्व्हर्टर व इन्व्हर्टर बॅट-याचा गॅरंटी कालावधी स्पष्टपणे नमूद करणे अनिवार्य आहे.

४. इन्व्हर्टर व इन्व्हर्टर बॅट-यांचे गॅरंटी व वारंटी कार्ड जिल्हा न्यायालयात जमा करणे आवश्यक राहील.

५. इन्व्हर्टर व इन्व्हर्टर बॅट-यांचे गॅरंटी व वारंटी कालावधीमध्ये काही बिघाड निर्माण झाल्यास किंवा साहित्य व्यवस्थित कार्य करीत नसल्यास, तक्रार केल्यापासुन दहा दिवसांचे आत नवीन इन्व्हर्टर बॅट-या पुरविणे आवश्यक राहील.

६. कोणत्याही प्रकारचे आगाऊ रक्कमेचे प्रदान केले जाणार नाही.

७. वरिल साहित्य पुरविण्याचे आदेश दिल्यास, दिलेल्या मुदतीतच पुरविले पाहीजे अन्यथा आदेश रद्द समजण्यात येईल याची जबाबदारी संबंधीत प्रतिष्ठानाची राहील.

८. सदरहू नमूद साहित्यांचा पुरवठा जिल्हा न्यायालय येथे करणे अनिवार्य असुन स्थापीत करुन देण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहील. त्याकरीता वेगळा खर्च मिळणार नाही.

९. निवीदा कोणत्याही कारणास्तव रद्द करणे किंवा मागणी संख्येत वाढ किंवा घट करणे याबाबतचा पुर्ण अधिकार प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश गडचिरोली यांना

१०. साहित्याचा पुरवठा विहीत मुदतीत केल्यानंतर व साहित्य सुस्थितीत पुरवठा झाल्याची कार्यालयास खात्री पटल्यानंतर निधीच्या उपलब्धतेनूसार रक्कमेचे प्रदान केल्या जाईल.

११. दरपत्रकामध्ये जि.एस.टी. क्रमांक नमुद करावे तसेच सोबत पॅन कार्ड तसेच स्थानिक प्रशासनाचे व्यवसाय प्रमाणपत्राची छायांकित प्रत जोडावी अन्यथा दरपत्रक/निवीदा रद्द करण्यात येईल.

आदेशान्वये

प्रभारी प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, गडचिरोली

टेंडर नोटीसची प्रत बेलीफामार्फत जिल्हा न्यायालयाचे नोटीस बोर्डावर व जिल्हा न्यायालयाच्या संकेतस्थळावर प्रकाशीत करण्यात यावी.

प्रभारी प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, गडचिरोली